NUTA BULLETIN
FORTNIGHTLY JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHER'S ASSOCIATION
Regd. No. ATI 263 *Licensed to post without prepayment No. ATI 10
YEAR : 22 ) 18 th MAY, 1997 ( NO : 5

# पांढरकवडा शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना

***प्रा.बी.टी.देशमुख,*** *विधानपरिषद सदस्य.*

१. सत्यशोधन समितीच्या अहवालानुसार महाराष्ट्रामध्ये नागरी पाणी पुरवठ्याचा सर्वात जास्त अनुशेष असलेला प्रदेश (Region) म्हणजे विदर्भ. २७३ दशलक्ष लिटर्स दरदिवशी म्हणजे सर्वात जास्त अनुशेष असलेल्या या प्रदेशातील सर्वात जास्त (६१ दशलक्ष लिटर्स दरदिवशीचा) अनुशेष असलेला क्रमांक एकचा जिल्हा म्हणजे अमरावती, त्यातील महत्तम अनुशेष असलेले क्रमांक एकचे शहर (३२ दशलक्ष लिटर्स दरदिवशी) म्हणजे अमरावती. विदर्भातील नागरी पाणी पुरवठ्याचा दरदिवशीचा ५६ दशलक्ष लिटर्स अनुशेष निश्चित झालेला क्रमांक दोनचा जिल्हा म्हणजे अकोला व क्रमांक दोनचे शहर सुद्धा अकोलाच. (दरदिवशी ३० दशलक्ष लिटर्स).

२. यवतमाळ जिल्ह्याचा नागरी पाणी पुरवठ्याचा अनुशेष दांडेकर समितीने २६ दशलक्ष लिटर्स दरदिवशी दाखविला असून त्यामध्ये एकट्या यवतमाळ शहराचा अनुशेष ११.५० दशलक्ष लिटर्स दरदिवशी एवढा आहे. पांढरकवडा ही “क” वर्ग नगरपालिका आहे. १९९१ च्या शिरगणतीप्रमाणे २२८१३ ही या शहराची लोकसंख्या असून आज ती अंदाजे २४ हजार आहे. १९८२ च्या लोकसंख्येच्या आधारे सत्यशोधन समितीने या शहराचा पाणीपुरवठ्याचा अनुशेष २० लक्ष लिटर्स दरदिवशी निश्चित केलेला आहे. विदर्भातील बहुतेक शहरे, अमरावती महसूल विभागाच्या अमरावती, अकोला, बुलढाणा जिल्ह्यातील सर्वच शहरे व यवतमाळ जिल्ह्यातील सात शहरे नागरी पाणी पुरवठ्याच्या अनुशेषात आहेत.

# १९९४ च्या दुसऱ्या अधिवेशनात "या योजनेची सर्व कामे निधीच्या उपलब्धतेनुसार डिसेंबर १९९६ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे." असे शासनातर्फे आश्वासन

३. एखाद्या शहराच्या नागरी पाणी पुरवठ्याच्या अनुशेषाचे मोजमाप कसे करावे ? तो अनुशेष किती आहे हे कसे ठरवावे ? याचे मापदंड सत्यशोधन समितीने ठरवून दिलेले आहेत. राष्ट्रीय पातळीवर निश्चित झालेल्या प्रमाणकानुसार सार्वजनिक यंत्रणेच्या माध्यमातून एखाद्या शहराला दररोजी उपलब्ध व्हावयाचा **अपेक्षित पाणी पुरवठा व प्रत्यक्ष पाणीपुरवठा यातील फरक म्हणजे त्या शहराचा अनुशेष होय.** प्रत्यक्ष पाणीपुरवठा हा अपेक्षित पाणीपुरवठ्यापेक्षा जास्त असेल अशा शहराला या विकास क्षेत्रामध्ये बिगर अनुशेष शहर असे म्हणता येईल. **प्रत्यक्ष पाणीपुरवठा हा अपेक्षित पुरवठ्यापेक्षा कमी असेल तर ते शहर नागरी पाणी पुरवठ्याच्या विकास क्षेत्रामधील अनुशेष शहर होय.** पांढरकवडा या शहराला दरदिवशी २० लक्ष लिटर्स पाणी प्रमाणभूत दरापेक्षा कमी मिळत होते हे सत्यशोधन समितीच्या (दांडेकर) आकडेवारीवरून स्पष्ट होते. अनुशेष निर्मिती व अनुशेष निर्मुलनाची सैध्दांतिक चर्चा करीत असतांनाच अनुशेष निर्मुलनास मदत करणारा त्या त्या विकासक्षेत्रातील एक एक प्रकल्प पुर्णत्वास गेला तरच शेवटी हा अनुशेष दुर होवू शकेल. ही पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्यामुळे एका महत्वाच्या विकासक्षेत्रातील लहानसा अनुशेष दुर होत आहे ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.

४. आपल्या नशिबी आलेल्या या अनुशेषाच्या कंबरेवर लाथ घालण्याचा प्रयत्न अशा कमनशिबी वर्गात समाविष्ट असलेले सर्वच लोक व लोकप्रतिनीधी आपापल्या शक्तिनुसार करीत असतात हे प्रयत्न सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेरहि सतत चालु असतात, असले पाहिजेत. पांढरकवडा शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेबाबतचा विधानपरिषदेतील अल्पसा प्रयत्न पुढील परिच्छेदातून नमुद केला आहे.

## पांढरकवडा वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन-१९९४*
*मंगळवार, दिनांक २६ जुलै १९९४*

(१६) ३८७०७ **सर्वश्री बी.टी.देशमुख, सुरेश पाटील, पी.जी.दस्तुरकर, व्ही.यू.डायगव्हाणे :** सन्माननीय नगरविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ११ ऑगष्ट १९९२ च्या शासन निर्णयाने (क्रमांक पा.पु.यो.१०९०/१४२२/सी.आर.१६४/९०/नवि.३०) प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या व प्रत्यक्ष काम सुरु असलेल्या १४६ लक्ष रुपये किंमतीच्या पांढरकवडा वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे :

(२) ३१ मार्च १९९४ पावेतो या योजनेवर किती खर्च झालेला आहे :

(३) ही योजना पूर्ण करण्याचे विभागाने काय नियोजन केलेले आहे ?

**श्री. अरुण गुजराथी :**

(१) पांढरकवडा वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती पुढीलप्रमाणे आहे :-

(अ) या योजनेसाठी खुनी नदीवर दगडी बंधारा बांधण्यात आला असून ट्रेंच गॅलरीचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

(ब) ऊर्ध्वनलिकेच्या (गुरुत्ववाहीनी) कामाचे कंत्राट निश्चित करण्यात आलेले आहे.

(क) ११ लाख लिटर्स क्षमतेच्या पाण्याच्या उंच टाकीचे काम प्रगतिपथावर आहे.

(ड) जलशुद्धीकरण केंद्राचे कामाकरीता निविदा मागविण्यात आलेल्या असून कंत्राट निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) ३१ मार्च १९९४ पावेतो या योजनेवर रुपये २४.५७ लाख खर्च झालेला आहे.

(३)या योजनेची सर्व कामे निधीच्या उपलब्धतेनुसार डिसेंबर १९९६ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

## पांढरकवडा वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन-१९९५*
*शुक्रवार, दिनांक ७ एप्रिल १९९५*
*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या आठव्या यादीतील प्रश्न क्रमांक ४०९१२ (एलसी/६४३)*

(१२)४०९१२ (९.११.९४) **सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यू.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, जयवंत ठाकरे** : तारांकित प्रश्न क्रमांक ३८७०७ ला दिनांक २६ जुलै १९९४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय नगरविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या व प्रत्यक्ष काम सुरु असलेल्या १४६ लक्ष रुपये किंमतीच्या पांढरकवडा येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामावर १९९४-९५ या आर्थिक वर्षात किती खर्च करण्याचे नियोजन केले आहे :

(२) ही योजना डिसेंबर १९९६ मध्ये पूर्ण करण्याचे दृष्टीने विभागाने काय आर्थिक नियोजन केलेले आहे ?

**श्री. अरुण गुजराथी (३.३.९५) :**

(१) १९९४-९५ या वर्षात सदर योजनेवर रु.८२.०० लाख खर्च करण्याचे नियोजन केले आहे.

(२) सन १९९५-९६ व १९९६-९७ साठी एकूण रु. ४०.२३ लाख खर्चाचे नियोजन आहे.


कृषी उत्पन्न बाजार समिती पांढरकवडाचे वतीने
**हार्दिक शुभेच्छा**
***शेतकऱ्यांचे हिताकडे लक्ष पुरविणारी एकमेव संस्था***

**मुख्ययार्ड :** पांढरकवडा (फोन नं. २७४१८) **सबयार्ड :** १. पाटणबोरी २. मोहदा ३. रुंझा ४. करंजी

**केलेली विकासाची कामे : १.** मुख्ययार्ड पांढरकवडा येथे शेतक-यांचे सोयी करिता ३० मे. टन इलेक्ट्रॉनिक कापूस ट्रक तोल काटा बसविण्यात आला आहे. २. सबयार्ड पाटणबोरी येथे केंद्रीय अनुदान व स्वतःचे फंडातून ऑफिस कम गोडावून व ऑक्शन प्लॅटफॉर्म **३.** आदिवासी विभागातील करंजी सबयार्ड ठिकाणी रोजगार हमी योजना व आश्वासीत रोजगार योजनेअंतर्गत अनुदानातून रू. ९.८० लाखाची विकासाची कामे हाती घेण्यात येणार आहे.

**श्री. अजाबराव चौधरी** *सभापती*

**श्री. श्रीहरी कट्टेवार** *उपसभापती*

तसेच सर्व सन्माननीय सदस्य गण कृषी उत्पन्न बाजार समिती, पांढरकवडा

# १९९५ च्या पहिल्या अधिवेशनात "१९९४-९५ या वर्षात सदर योजनेवर रु.८२.०० लाख खर्च करण्याचे नियोजन केले आहे" अशी शासनातर्फे माहीती

५. अनुशेषांत असलेल्या शहरांना दरवर्षी पाण्याचा तुटवडा जाणवतो व विशेषतः उन्हाळ्यात तर ही रखरख मोठ्या प्रमाणात वाढते, परिणामी लोकांच्या असंतोषाला तोंड देतांना तातडीच्या पाणी पुरवठा योजना शासनाला घ्याव्या लागतात. अनुशेष नसलेल्या शहरांना अशा तातडीच्या पाणी पुरवठा योजनांची गरजच पडत नाही ही गोष्ट उघड आहे. १९८६ ते १९९५ या नऊ वर्षांच्या कालखंडात लहानमोठ्या किमतीच्या ८ तातडीच्या पाणीपुरवठा योजना पांढरकवडा शहरासाठी घ्याव्या लागल्या, त्याचे मुख्य कारण म्हणजे मुळ योजनेतुन उपलब्ध होणारे तुटपुंजे पाणी हेच होय.

१. १९८६ च्या उन्हाळ्यासाठी सँडबॅग बंधाऱ्याचे काम मंडळातर्फे करण्यात आले.

### पांढरकवडा वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन-१९९५*
*बुधवार, दिनांक २६ जुलै १९९५*

(११) १४०२ **सर्वश्री सुरेश पाटील, बी.टी.देशमुख, व्ही.यू.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे :** शुक्रवार, दिनांक ७ एप्रिल १९९५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या आठव्या यादीतील प्रश्न क्रमांक ४०९१२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या व काम सुरु असलेल्या १४६ लक्ष रुपये किंमतीच्या पांढरकवडा येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामावर ३१ मार्च १९९५ पावेतो प्रत्यक्ष एकूण किती खर्च करण्यात आला आहे :

(२) १९९५-९६ या आर्थिक वर्षात किती निधी या कामासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे :

(३) या योजनेच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. मनोहर जोशी :**

(१) ३१ मार्च १९९५ पावेतो या योजनेवर प्रत्यक्ष खर्च रु. ७२.०४ लक्ष एवढा करण्यात आला आहे.

(२) १९९५-९६ या आर्थिक वर्षात रु. ५२.०० लाख एवढा निधी उपलब्ध आहे.

(३) योजनेतील दगडी बंधारा, पाण्याची उंच टाकी यांचे काम पूर्ण झाले असून गुरुत्ववाहिनी व जलशुद्धीकरण केंद्राचे काम प्रगतीपथावर आहे. वितरण व्यवस्था, शुद्ध व अशुद्ध पाण्याच्या पंपाचे साहित्य प्राप्त झाले असून वितरण व्यवस्थेच्या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत.

२. १९८७ च्या उन्हाळ्याकरिता सँडबॅग बंधारा व ७ बोअरवेल हातपंपासह बसविण्यासाठी ५.२२ लक्ष रूपयाची तातडीची योजना घेण्यात आली. प्रत्यक्ष खर्च २.८३ लक्ष रूपये झाला.

३. १८८८ च्या उन्हाळ्याकरिता सँडबॅग बंधाऱ्याचे तातडीचे काम घ्यावे लागले.

४. १९९० च्या उन्हाळ्यासाठी पी.व्ही.सी. पाईप टाकणे व २ सबमर्सिबल पंप बसविणे या तातडीच्या कामावर ९८ हजार रूपयाचा

### पांढरकवडा वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन-१९९६*
*गुरुवार, दिनांक २१ मार्च १९९६*
*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या दुसऱ्या यादितील प्रश्न क्रमांक (१२) ४५४३ (एलसी/६४३)*

(१२)४५४३ (१५.११.९५) **सर्वश्री बी.के.रघुवंशी, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील :** तारांकित प्रश्न क्रमांक १४०२ ला बुधवार दिनांक २६ जुलै १९९५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भांत सन्माननीय पाणीपुरवठा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या व काम सुरु असलेल्या १४६ लक्ष रुपये किंमतीच्या पांढरकवडा येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाचा भाग असलेल्या वितरण व्यवस्थेच्या कामाच्या निविदा मागवून प्रत्यक्ष काम सुरु करण्याच्या प्रश्नांची सद्यःस्थिती काय आहे व वितरण व्यवस्थेचे काम नियोजनाप्रमाणे केव्हा पूर्ण करावयाचे आहे

(२) वितरण व्यवस्थेच्या कामाला केव्हा सुरुवात झाली आहे ;

(३) अद्यापि या कामास सुरुवात झालेली नसल्यास त्याबाबत होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. अण्णा डांगे (१.२.९६) :**

(१) वितरण व्यवस्थेच्या कामाचे कंत्राट देण्यात आले असून ठेकेदाराकडून प्रत्यक्ष कामास दिनांक ११ नोव्हेंबर १९९५ ला सुरुवात करण्यात आली असून ह्या कामाकरीता लागणारे पाईप्स मिळविण्यात आले आहेत. काम पूर्ण करण्याची नियोजित तारीख ९ जून १९९६ आहे.

(२) वितरण व्यवस्थेचे कामास दिनांक ११ नोव्हेंबर १९९५ पासून सुरुवात झालेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.


**हार्दिक शुभेच्छा.**

जनशक्ती शिक्षण संस्था पांढरकवडा संचालित

***श्री. बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा***

श्री. बाळासाहेब देशमुख पारवेकर — *अध्यक्ष*
श्री. अण्णासाहेब देशमुख पारवेकर — *सचिव*
श्री. गोपाळकृष्ण पाटील
श्रीमती कृष्णाबाई कुळकर्णी — *उपाध्यक्ष*
श्री. एस.बी.होटे — *प्राचार्य*

**श्रीराम फर्निचर मार्ट, पांढरकवडा तर्फे**

**नुटाच्या स्तुत्य उपक्रमास शुभेच्छा**

**प्रो. विठ्ठलराव कहाळे**

# १९९७ च्या दुसऱ्या अधिवेशनात "३१ मार्च १९९७ पावेतो या योजनेवर प्रत्यक्ष खर्च रु. ७२.०४ लक्ष एवढा करण्यात आला आहे." असे शासनातर्फे सांगण्यात आले.

खर्च करावा लागला.

५. १९९२ च्या उन्हाळ्याकरिता खाजगी विहीरीवर पंप बसविणे, पीव्हीसी पाईपलाईन, इलेक्ट्रीक कनेक्शन इत्यादी कामासाठी १.६९ लक्ष रूपयाची तातडीची योजना घ्यावी लागली.

६. पुन्हा १९९२ च्या उन्हाळ्यासाठी ५ विंधन विहीरी हात पंपासह हे काम तातडीच्या योजनेत करावे लागले.

७. १९९३ च्या उन्हाळ्याकरीता ३ विंधन विहीरी विद्युत पंपासह आवश्यक पाईपलाईन या कामासाठी ५ लक्ष रूपये किमतीची तातडीची योजना मंजूर करावी लागली.

८. १९९५ च्या उन्हाळ्याकरिता १ शुद्ध व अशुद्ध पाणी वाहून नेणारे पंप बदलविणे. ६०० मि. पाईपलाईन व दोन विंधन विहीरी या कामाचा समावेश असलेली ७.१४ लक्ष रूपयाची योजना मंजूर करावी लागली.

६. खरे म्हणजे पांढरकवडा शहराला सतत जाणविणाऱ्या या पाण्याच्या टंचाईचा प्रश्न १९९० मध्ये विधान परिषदेत चर्चेला आल्याचे दिसून येते. विधानपरिषद सदस्य डॉ. पंजाबराव देशमुख यांनी "पांढरकवडा नगरपालिका क्षेत्रातील नळ पाणी पुरवठा योजना नादुरूस्त असणे" या विषयावर दिलेली एक लक्षवेधी सूचना १८ जुलै १९९० रोजी सभागृहामध्ये चर्चेसाठी होती. नगर विकास राज्यमंत्री यांनी शासनाच्या वतीने केलेल्या निवेदनात योजना नादुरूस्तीवर तांत्रिक उत्तरे दिली होती. प्रदुषण होवू नये म्हणून काय काळजी घेतली जाते

## पांढरकवडा वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन-१९९६*

*शुक्रवार, दिनांक १३ डिसेंबर १९९६*

*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या चौथ्या यादितील*

*प्रश्न क्रमांक (३) ८७४७ (एलसी/६४३)*

(३) ८७४७ (२४.६.९६) **सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील :** दिनांक २१ मार्च, १९९६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या दुसऱ्या यादीतील प्र.क्र.४५४३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय पाणीपुरवठा मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :

(१) प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या व काम सुरु असलेल्या १४६ लक्ष रुपये किंमतीच्या पांढरकवडा येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेचा भाग असलेल्या विविध उपांगांच्या बांधकामाची सद्यःस्थिती काय आहे :

(२) वितरण व्यवस्थेच्या कामाच्या विविदा मागवून प्रत्यक्ष काम सुरु करण्याच्या प्रश्नांची सद्यःस्थिती काय आहे व वितरण व्यवस्थेचे काम नियोजनाप्रमाणे जून, १९९६ पर्यंत पूर्ण करुन वाढीव पाणीपुरवठा योजना प्रत्यक्ष कार्यान्वित करण्याचे विभागाने काय नियोजन केले आहे :

(३) नियोजन केले नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अण्णा डांगे (२४.९.९६) :**

(१) योजनेच्या विविध उपांगाच्या बांधकामाची सद्यःस्थिती पुढे दर्शविल्याप्रमाणे आहे :-

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | पुरवठा विहीर | .. | काम पूर्ण |
| (२) | दगडी बंधारा | .. | काम पूर्ण |
| (३) | अशुद्ध पाण्याचे पंप | .. | पंपाची उभारणी पूर्ण, विद्युत पुरवठा मिळवावयाचा आहे. |
| (४) | ब्रेक प्रेशर टँक | .. | जमिनीपर्यंतचे बांधकाम पूर्ण |
| (५) | गुरुत्ववाहिनी | .. | खोदकाम व पाईप टाकणे पूर्ण चाचणीचे काम प्रगतीपथावर |
| (६) | जलशुद्धीकरण केंद्र | .. | काम प्रगतीपथावर (७५ टक्के काम पूर्ण) |
| (७) | शुद्ध पाण्याचे पंप | .. | पंपाची उभारणी पूर्ण, वीज पुरवठा मिळवावयाचा आहे. |
| (८) | शुद्ध पाण्याची उर्ध्वनलिका | .. | ३० मिटर लांबीची उर्ध्व-नलिका टाकावयाची आहे. |
| (९) | उंच पाण्याची टाकी | .. | काम पूर्ण |
| (१०) | वितरण व्यवस्था | .. | सर्व साहित्य प्राप्त, पाईप जोडणी २० टक्के पूर्ण |

(२) वितरण व्यवस्थेच्या निविदा मंजूर करण्यात येऊन दिनांक ११ नोव्हेंबर १९९५ ला काम सुरु करण्यात आले, व डिसेंबर १९९६ पर्यंत हे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

हार्दिक शुभेच्छा

अग्रवाल कृषि केंद्र

पांढरकवडा

फोन नं. २७५३३

हार्दिक शुभेच्छा

हॉटेल अखिल

पांढरकवडा

प्रो. भरतकुमार नारायणराव बोरेले

# १९९६ च्या पहिल्या अधिवेशनात "वितरण व्यवस्थेचे कामास दिनांक ११ नोव्हेंबर १९९७ पासून सुरुवात झालेली आहे." अशी शासनातर्फे माहिती देण्यात आली

याबाबतची माहिती दिली होती व त्याच निवेदनामध्ये शहराच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेबाबत "पांढरकवडा वाढीव पाणीपुरवठा योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे एप्रिल १९९० मध्ये अधिक्षक अभियंता परिसर अभियांत्रिकी मंडळ अकोला यांचेकडून प्राप्त झाले असून योजनेचे अंदाजपत्रके व आराखड्यांची तांत्रिक छाननी मंडळातर्फे चालु आहे" असे एक वाक्य नमुद होते.

लक्षवेधी सुचनेच्या निवेदनावरील अनुपुरक चर्चेमध्ये "अध्यक्ष महाराज, १० टक्के लोकवर्गणी भरण्यास नगरपालिकेची तयारी असेल तर अतिसत्वर वाढीव योजनेला शासन मंजूरी देईल" असे उत्तर नगरविकास राज्यमंत्री श्री. अरूण गुजराथी यांनी दिले. त्यावर डॉ. पंजाबराव देशमुख यांनी "किती दिवसात मंजूरी दिली जाईल?" असा प्रश्न विचारला असता मा. राज्यमंत्र्यांनी "हे मला सांगता येणार नाही" असे उत्तर दिले. १० टक्के लोकवर्गणीबाबतच्या ओढाताणीत चर्चा बरीच झाली पण शेवटी "अध्यक्ष महाराज या योजनेच्या संदर्भात शासनाचे धोरण सहानुभुतीचे राहिल. परंतु या योजनेचा संपूर्ण प्रस्ताव तपासावा लागेल" या राज्यमंत्र्यांच्या उत्तराने या चर्चेचा शेवट झाला.

७. पुढे १९९१ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेच्या आश्वासन समितीचे समितीप्रमुख म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख यांची नेमणूक झाल्यावर नवनियुक्त आश्वासन समितीच्या १९ सप्टेंबर १९९१ च्या बैठकीत डॉ. देशमुख यांनी समितीप्रमुख या नात्याने या योजनेचा प्रश्न उपस्थित केला. लक्षवेधी सुचनेवर देण्यात आलेल्या आश्वासनांचा तपशिल देवून विभागाकडून माहिती मागविण्यात आली. पुढे ७ सप्टेंबर १९९२ रोजी या विषयावर नगरविकास सचिवांची समिती समोर साक्ष सुद्धा झाली.

## पांढरकवडा वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन-१९९७*
*सोमवार, दिनांक ३१ मार्च १९९७*

(१०) १५५१३ **सर्वश्री जयवंत ठाकरे, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, व्ही.यु.डायगव्हाणे** दिनांक १३ डिसेंबर १९९६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या चौथ्या यादीतील प्रश्न क्रमांक ८७४७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय पाणीपुरवठा मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :

१. प्रशासकीय मान्यता प्राप्त १४६ लक्ष रुपये किमतीच्या पांढरकवडा येथील वाढीव पाणी पुरवठा योजनेचा बांधकामाधीन प्रकल्प पूर्ण करून नियोजनाप्रमाणे डिसेंबर १९९६ मध्ये कार्यान्वीत करण्यात आला हे खरे आहे काय?

२. असल्यास, प्रकल्पातून पाणीपुरवठा केव्हा सुरू करण्यात आला आहे,

३. नसल्यास प्रकल्प कार्यान्वीत होण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत?

**श्री. अण्णा डांगे :** (१) नाही. तथापि बंहुतांशी कामे डिसेंबर १९९६ पर्यंत पूर्ण करण्यात आली.

(२) १२ मार्च १९९७ मध्ये पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

## पांढरकवडा नागरी पाणी पुरवठा योजना
## मुळ योजना

१. प्रशासकीय मान्यता : नगर विकास व आरोग्य व गृह निर्माण शासन निर्णय क्र. एमडब्ल्यूएस/२७६४/४३८२५/एएम, दि. १९.३.६९

२. तांत्रिक मंजूरी : पाटबंधारे व वीज विभाग क्र. डब्ल्यू/एसएम/८४६५९२१०७/पीएम, दि. ८.१.७०

३. योजनेची किंमत : रू. १२.७६ लक्ष

४. पाणी पुरवठ्याचा दर : ७० लि. / माणशी / दिवशी

५. संकल्पीत लोकसंख्या : २०,०००

६. योजना सुरु झाल्याचा दिनांक : १०.४.७४

७. योजनेतील उपकामे :

१. हेड वर्क्स : खुनी नदीच्या डाव्या काठावर

I. ईनटेकपाईप : ३०० एम.एम.सी.आय. १६ मि. लांब

II. जॅकवेल पंपहाउससहित : ५ मि.व्यासाची १२.५ मि.खोल

२. पंपींग मशनरी : १२.५० एच.पी.व्ही.टी.पंप २९ मि. हेड

३. उर्ध्वनलिका : २५० मि.मि. व्यासाची सी.आय.एल.ए. पाईपलाईन १६९५ मि.

४. जलशुद्धीकरण केंद्र : १.६८ द.ल.लि.क्षमता

५. शुद्ध पाणी संप व पंप हाउस : ७०,००० लि.क्षमतेचे संप, पंप हाउस सहित.

६. पंप शुद्ध पाण्याकरीता : १० एच.पी. २ नग १५ मि. हेड

७. उर्ध्वनलिका : २५० मि.मि.सी.आय.पाईप १५० मि. लांब

८. पाण्याची उंच टाकी : ४५६००० लि. क्षमतेचे ८ मि. उंच

९. वितरण व्यवस्था : सी.आय.पाईपलाईन ४० मि.मि. ते ३०० मि.मि. व्यासाची, १२६०० मि. लांब

८. योजना पूर्ण झाल्याचा दिनांक : १९७२

९. योजना हस्तांतरचा दिनांक : १.४.७४

हार्दिक शुभेच्छा
तापी प्रिस्ट्रेस्ट प्रॉडक्टस लि.
*बँक ऑफ तापी रिव्हर,*
अंजले, जि. जळगाव
*फोन नं. २४४२३, २४, २५ फॅक्स : (०२५८२) २४४२६*

हार्दिक शुभेच्छा
मे. जैन कन्स्ट्रक्शन
इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर्स
*३१५, लक्ष्मी वैभव, दक्षिण अंबाझरी रोड,*
बजाज नगर, नागपूर.

# १९९६ च्या तिसऱ्या अधिवेशनात "डिसेंबर १९९६ पर्यंत हे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे" असे आश्वासन

८. पाणी पुरवठा योजनेच्या आर्थिक आकृतीबंधामध्ये १० टक्के लोकवर्गणीची अट असल्यामुळे बलवान भागांच्या योजना तडीला जातात व अप्रगत विभाग मागे राहतात या अनुभवामुळे अमरावती पाणी पुरवठा योजनेतून दहा टक्क्याची अट काढून टाकण्यासाठी झालेल्या लोक चळवळीने महाराष्ट्राच्या पाणीपुरवठ्याच्या लोकवर्गणीचा इतिहासच बदलवून टाकला. **पुढे सर्व क वर्ग नगरपालिकांसाठी ही अट काढून टाकण्यात आली.** या लढ्यामध्ये विधानपरिषदेत अमरावतीकरांना सोबत करणाऱ्या त्यावेळच्या एका विधानपरिषद सदस्याने पुढे मुख्यमंत्री झाल्यावर अमरावती शहराच्या वेळी आलेला अनुभव लक्षात घेवून "१० टक्के लोकवर्गणी न भरल्यामुळे अनेक योजना पूर्ण होत नाहीत. म्हणून माझ्या शासनाने अशा प्रकारचा विचार केलेला आहे की १० टक्के लोकवर्गणीची अट ही पूर्णपणे काढून टाकण्यात यावी." असे विधानसभेत जाहीर केले व त्याप्रमाणे शासननिर्णयही निर्गमित झाला आहे. मा. मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी यांनी २० जुलै १९९५ रोजी नगरविकास विभागाच्या मागण्यावरील चर्चेला उत्तर देतांना विधानसभेत वरील निर्णय घोषित करतांना पुढील शब्दात उल्लेख केला "अनेक ठिकाणी ही लोकवर्गणी भरली जात नसल्यामुळे ही लोकवर्गणी भरण्याची नगरपालिकांची क्षमता, ताकद नसल्यामुळे, या योजना सुरु झाल्या नाहीत. या योजना फक्त कागदावर दिसून येत आहेत...... अमरावती महापालिकेचा त्याला अपवाद आहे. विधानपरिषद सदस्य श्री. बी.टी.देशमुख यांनी याबाबत अतिशय तर्कशुद्ध माहिती दिली आणि त्यांचे आरग्युमेंट शासनाला मान्य झाले. मी त्यावेळी सभागृहामध्ये उपस्थित होतो. तेव्हा फक्त अमरावती नगरपालिकेला अपवाद करण्यात आला आहे. गेल्या ४/५ महिन्यामध्ये अनेक नगरपालिकांनी मला विनंती केली."

९. "अ" वर्ग नगरपालिकांच्या करिता १० टक्के लोकवर्गणीची अट राहिली नाही हा १९९५ मधील इतिहास झाला. पण अमरावतीसारख्या महापालिकेला १० टक्के लोकवर्गणीची अट शिथिल करण्यात आली मग "क" वर्ग नगरपालिकांनी शासनाचे काय घोडे मारले? अशी चर्चा १९८७ पासून तर १९९२ पर्यंत सतत महाराष्ट्रभर व विधानमंडळाच्या दोनहि सभागृहामध्ये होत राहीली. परिणामी "क"

## पांढरकवडा नागरी पाणी पुरवठा योजना
## ब. प्रगतीपथावरील योजना

१. योजनेचे नांव : वाढीव पाणी पुवरठा योजना

२. प्रशासकीय मान्यता : नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. पापुयो/१०९०/१४२२/सीआर/१६४/नवि/४०, दि. ११.८.९२

३. तांत्रिक मान्यता : मुख्य अभियंता (ना), महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलःनिस्सारण मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. पापुयो/१०८५/८४०/सीआर/ ३३३/प्रशाना.४/७०४४, दि. २७.८.९२

४. योजनेची किंमत : रु. १४६.८० लक्ष ढोबळ

५. आर्थिक विवरण :
- १.शासकीय अनुदान ५० टक्के : ७३.४० लक्ष
- २.आयुर्विमा कर्ज ५० टक्के : ७३.४० लक्ष

६. संकल्पित लोकसंख्या : ४५००० (२००८)

७. योजनेचे स्वरुप : सध्या अस्तित्वात असलेल्या मुळ योजनेचा उद्भव, खुनी नदी, कमी पडत असल्यामुळे सायखेड धरण उद्भव धरून योजना आखण्यात आली आहे. या योजनेमध्ये उद्भव विस्तार, जलशुद्धीकरण केंद्र, उर्ध्वनलिका, पाण्याची उंच टाकी इत्यादी कामे समाविष्ट आहेत.

८. योजनेचा उद्भव : सायखेड धरणाचे पाणी खुनी नदी मध्ये घेणे.

९. दरडोई पाणी पुरवठा : १०० लि. दरडोई माणशी

१०. लोकवर्गणी : लोकवर्गणी लागू नाही.

११. अ. योजना सुरु झाल्याचा दिनांक : मे, १९९३

ब. योजना कार्यान्वीतचा दिनांक : कामे प्रगतीपथावर

१२. खर्च :

१३. योजनेतील समाविष्ट कामे

अ.क्र. समाविष्ट कामाचा तपशील

१. हेडवर्क्स
- I. हॉरीझॉंटल फिल्टर
- II. यू.सी.आर.बंधारा
- III. ६०० मि.मि.एम.एस.शाप्ट ९ मी. उंच

२. पंप व्ही.टी. अशुद्ध पाण्याचे ४० अश्वशक्तीचे २ नग पंप अप्राप्त

३. पी.एस.सी. पाईप गुरूत्ववाहिनी ४०० मि.मि. व्यासाची ८ किलो प्रती वर्ग से.मी., १९२० मि. लांब पाईप बनविणे सुरु आहे.

४. ३०० मि.मि. व्यासाची सी.आय. शुद्ध पाण्याची पाईपलाईन ३० मि. लांब

५. जलशुद्धीकरण केंद्र ६.५० एम.एल.डी. क्षमतेचे आर.सी.सी.संप २७०००० लि. क्षमता

६. शुद्ध पाणी पंपींग मशनरी ५५ अश्वशक्तीचे पंप अप्राप्त

७. पाण्याची उंच टाकी क्षमता ११ लक्षलिटर्स व १६ मि. उंच

८. वितरण व्यवस्था

९. किरकोळ


**हार्दिक शुभेच्छा**

**श्री.बा.दे.पारवेकर कॉलेज कर्मचारी सहकारी भाडेकरू मालकी गृह *निर्माण संस्था म. पांढरकवडा***

प्राचार्य एस.बी.होटे — *अध्यक्ष* | श्री.एम.जी.देशमुख — *उपाध्यक्ष* | श्री.अरूण मांडगावकर — *सचिव*

**Gruhalaxmi Home Appliances**

***Pandharkawada***

Godrej Refrigarators Videocon, Panasonic, Onida, BPL, Colour & B/W TV
Maharaja Mixer & Grinder Steel Furniture Air Coolars Phillps
Audio & Video

**मे. भगवानदास सुंदरलाल केडीया**

***किराणा मर्चंट पांढरकवडा***

**प्रो. केडीया बंधू**

**टिचर्स एज्युकेशन सोसायटी, पांढरकवडा जि. यवतमाळ**

***नोंदणी क्र. ५०६ व्दारा संचलीत***

विकास हिंदी शिशू मंदिर, विकास हिंदी विद्यालय, विकास हिंदी कनिष्ठ महाविद्यालय, बाल भवन वाऱ्हा

**अ.मा. पैठणकर** — *अध्यक्ष* | **मु.मा. आवारी** — *उपाध्यक्ष* | **राजाभाऊ निवळ** — *कोषाध्यक्ष* | **किशोर वैद्य** — *सचिव*

**संचालक** सौ. पद्मभजा वैद्य, सौ. विणा मराठे, श्री. आनंद वैद्य

# १९९७ च्या पहिल्या अधिवेशनात "१२ मार्च १९९७ मध्ये पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे." अशी माहीती शासनातर्फे देण्यात आली.

वर्ग नगरपालिकासाठी १० टक्के लोकवर्गणीची अट शिथिल करणारा शासननिर्णय त्यावेळच्या शासनाला निर्गमित करावा लागला.

१०. "क" वर्ग नगरपरिषदांच्या पाणी पुरवठा योजना. वित्तिय सहाय्याचा सुधारित आकृतीबंध." या मथळ्याने महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने २० जानेवारी १९९२ रोजी निर्गमित केलेल्या (शासन निर्णय क्रमांक : पापुयो-१०९०/६८३/प्र.क्र.१४६/नवि-२८) शासननिर्णयाच्या परिच्छेद ३ मध्ये "या नगरपरिषदांची आर्थिक स्थिती समाधानकारक नसल्यामुळे पाणी पुरवठा योजनांच्या किंमतीच्या १० टक्के लोकवर्गणीची रक्कम भरणेही या नगरपरिषदांना शक्य होत नाही. नगरपरिषदा लोकवर्गणीचा पहिला हप्ता भरू शकत नाहीत, किंवा हप्ता भरण्यास फार उशीर करतात, याचा परिणाम योजनांची कामे उशिरा सुरू होण्यामध्ये होतो. त्याचप्रमाणे किंमत वाढीमुळे खर्चातही वाढ होते व त्याचा भार शासनावर व नगरपरिषदेवर पडतो. ही बाब विचारात घेऊन "क" वर्ग नगरपरिषदांनी भरावयाच्या त्यांच्या पाणी पुरवठा योजनांवरील १० टक्के लोकवर्गणीच्या रकमेत काही सवलत द्यावयाची अथवा लोकवर्गणीची रक्कम कर्जात रूपांतरित करण्याचा प्रस्ताव गेले काही दिवस शासनाच्या विचाराधीन होता." असे नमुद करून पुढच्याच परिच्छेदात पुढील शब्दामध्ये शासन निर्णय नमुद करण्यात आला आहे :-

"**शासन निर्णय :** वरील अडचणीचा सांगोपांग विचार होऊन राज्यातील "क" वर्ग नगरपरिषदांच्या पाणी पुरवठा व जलनिःसारण योजनांना शासन निर्णय, नगर विकास व आरोग्य विभाग क्र. एमडब्ल्यूएस- १०७६/९९२/नवि-२२, दि. ११ फेब्रुवारी, १९७७ अन्वये लागू करण्यांत आलेल्या वित्तिय आकृतीबंधात सुधारणा करून आता, सदर शासननिर्णयान्वये "क" वर्ग नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा योजनांसाठी लागू करण्यांत आलेल्या वित्तीय आकृतीबंधातील प्रचलित,

## पांढरकवडा नागरी पाणी पुरवठा योजना
## ई.टंचाई काळात घेण्यात आलेल्या उपाय योजनांचा तपशील

| अ.क्र. | वर्ष | योजनेची किंमत | योजनेवरील खर्च | प्रस्तावातील मंजूरीचा दिनांक काम व स्थिती |
|---|---|---|---|---|
| १. | १९८६ च्या उन्हाळ्याकरीता ११.२.८६ | रु. ०.३० लक्ष | रु. ०.२५ लक्ष | सँड बॅग बंधारा काम पूर्ण (मंडळातर्फे) |
| २. | १९८७ च्या उन्हाळ्याकरीता १४.१.८७ | रु. ५.२२ लक्ष | रु. २.८३ लक्ष | १.सँड बॅग बंधारा<br>२.७ बोअरवेल हातपंपासह |
| ३. | १९८८ च्या उन्हाळ्याकरीता | रु. ०.४७ लक्ष | रु. ०.२० लक्ष | १.सँड बॅग बंधारा |
| ४. | १९९० च्या पंप.उन्हाळ्याकरीता | रु. ०.९९ लक्ष | रु. ०.९८ लक्ष | पीव्हीसी पाईप टाकणे व २ सबमर्सिबल |
| ५. | १९९२ च्या उन्हाळ्याकरीता | रु. १.६९ लक्ष | रु. १.६९ लक्ष | खाजगी विहीरीवर पंप बसविणे, पीव्हीसी पाईपलाईन इलेक्ट्रीक कनेक्शन इत्यादी (न.प.चे काम) |
| ६. | १९९२ च्या उन्हाळ्याकरीता २५.३.९२ | रु. १.८० लक्ष | रु. ०.८० लक्ष | १.५ विंधन विहीरी हात पंपासह<br>२.दगडी बंधाऱ्याचे काम करण्यात आलेले नाही. (न.प.चे काम) |
| ७. | १९९३ च्या उन्हाळ्याकरीता ९.६.९६ | रु. ५.०० लक्ष | – | १.३ विंधन विहीरी विद्युत पंपासह<br>२.आवश्यक पाईपलाईन काम पूर्ण व्हायचे आहे (न.प.तर्फे राबविण्यात आली) |
| ८. | १९९५ च्या उन्हाळ्याकरीता | रु. ७.१४ लक्ष | | १.शुद्ध व अशुद्ध पाणी वाहू नेणारे पंप बदलविणे.<br>२.६०० मि. पाईपलाईन व दोन विंधन विहीरी. |


**श्री.बा.दे. पारवेकर महाविद्यालय, प्राध्यापक कर्मचारी सहकारी पत संस्था, पांढरकवडा**

**श्री.ए.के. टोपरे** — *अध्यक्ष*
**प्रा.बी.जी. भोंग** — *सचिव*

*व इतर सदस्यगण*

**Premrao G. Wakhare,**
Agent Life Insurance Corporation of India Pandharkawada.

**मे. राजेंद्र टेक्सटाईल्स भवानी (मिल्स)**
सतरंजी, बेडशीट, शालीचे विक्रेते
**प्रतिनिधी, गणेश खोंडे**

**आबासाहेब पारवेकर शेतकरी सहकारी जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी लि.**
*पांढरकवडा र.न. १०१ ता. केळापूर जि. यवतमाळ*
स्वर्गीय श्री. आबासाहेब पारवेकर संस्थापक अध्यक्ष यांनी स्थापन केलेला केळापूर तालुक्यातील अग्रगण्य शेतकरी सहकारी कापूस प्रक्रिया उद्योग - स्थापना :- ९.२.१९६३
कार्यान्वित जीन - २० डी.आर.युनिट- १९७१, कार्यक्षेत्र - केळापूर तालुका
सभासद संख्या - १५३८, जिनिंग क्षमता - ४० हजार क्विंटल कापूस

**मो.या. मामीडवार** — *अध्यक्ष*
**श.द. नगुरवार** — *उपाध्यक्ष*
**सां.मा. येल्टीवार** — *सेक्रेटरी*

**संचालक :** ब.के.उघडे, रा.ली. बोडेवार, तु.ही.चव्हाण, भा.गो. वरगंटीवार, अ.ज. राजूरकर, रा.पै. मरसकोल्हे, सौ. सु.का.मिलमिले, सौ. वि.व. उपलंचीवार, माननीय श्री. ज.त्र्य. देशमुख, पारवेकर, कार्यकारी संचालक व संस्थेचे आधारस्तंभ रामसिंह सेंगर, मॅनेजर

# सत्यशोधन समितीने पांढरकवडा शहराचा पाणीपुरवठ्याचा अनुशेष २० लक्ष लिटर्स दरदिवशी निश्चित केलेला आहे.

**१० टक्के लोकवर्गणीची अट रद्द करण्यास व खालीलप्रमाणे सुधारित वित्तिय आकृतीबंध लागू करण्यास शासनाची मंजुरी देण्यांत येत आहे."**

११. १० टक्के लोकवर्गणीच्या विरोधात जी लोकचळवळ अमरावती शहरामध्ये १९८६-८७ या वर्षात उभी झाली त्यामुळे १९९२ मध्ये "क" वर्ग नगरपालिकांच्या बोकांडी बसलेली लोकवर्गणीची अट शिथिल झाली व १९९५ मध्ये "अ" वर्ग नगरपालिका लोकवर्गणीच्या अटीपासून मुक्त झाल्या. हा याबाबतचा इतिहास आहे. २० जानेवारी १९९२ च्या "क" वर्ग नगरपालिकांसाठी लोकवर्गणीची अट रद्द करण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या स्थायी शासन निर्णयाचा फायदा विदर्भात सर्वप्रथम ज्या नगरपालिकांना मिळाला त्यात पांढरकवडा नगरपालिका एक प्रमुख होती हे नमुद करतांना मला आनंद वाटतो.

१२. १९९२ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर माझी तिसऱ्यांदा निवड झाली त्यावेळी किमान नागरीपाणी पुरवठ्याच्या अनुशेष निर्मुलनासाठी जबरदस्त आघाडी विधानमंडळात उघडावी असे ठरविण्यात आले. प्रत्येक नगरपालिकेबाबतचे बारिक सारिक तपशिल गोळा

## *पांढरकवडा वाढीव पाणी पुरवठा योजना*
## *जिल्हा यवतमाळ, प्रशासकीय मान्यता व शासकीय अनुदानाची मंजुरी.*

**महाराष्ट्र शासन : नगरविकास विभाग :**

**निर्णय क्रमांक पापुयो-१०९०/१४२२/सीआर-१६४/९०/नवि-३०**

**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ ऑगस्ट १९९२**

*संदर्भ :- महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःस्सारण मंडळाचे पत्र, दिनांक ६.८.१९९०*

**निर्णय :-** पांढरकवडा शहर पाणी पुरवठा योजनेच्या रू. १,४६,८०,०००/- ढोबळ किंमतीच्या नकाशे व आराखड्यांना प्रशासकीय मान्यता परिच्छेद ३ मधील अटीच्या आधीन राहून देण्यात येत आहे.

**२.** त्याचप्रमाणे योजनेच्या ढोबळ किंमतीच्या ५० टक्के म्हणजेच रू. ७३,४०,०००/- शासकीय अनुदान देण्यात येत आहे.

**३.** आता मंजूर केलेले अनुदान रोख द्यावयाचे नसून योजनेच्या कामाची जशी प्रगती होत जाईल त्याप्रमाणे योजनेच्या प्रत्यक्ष झालेल्या खर्चावर समायोजित करावयाची आहे. त्यामुळे मंडळाला उपयोजना प्रमाणपत्र दाखल करण्याची आवश्यकता नाही. ह्या योजनेला खालील अटींच्या आधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ) पांढरकवडा नगरपरिषदेने आर्थिक परिस्थिती सुधारण्याबाबत नगरपरिषदेच्या सर्व साधारण सभेच्या दि. २५.१०.९१ च्या ठरावाप्रमाणे कार्यवाही केल्याबाबत शासनाचे समाधान करावे.

ब) ही योजना १९९२-९३ च्या मंडळाच्या वार्षिक योजनेमध्ये अंतर्भूत करणे आवश्यक आहे.

क) योजना स्वयंसंतुलीत होण्यासाठी नगरपरिषदेने पाणी पट्टीत जरूर ती वाढ केली पाहिजे. त्याप्रमाणे या योजनेवर होणारा खर्च व मिळणारे उत्पन्न याचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवावा.

ड) ह्या योजनेसाठी पाटबंधारे विभागाकडून साईखेड धरणात पाण्याचे आरक्षण मिळाले पाहिजे. त्याशिवाय योजनेच्या कामास सुरूवात करू नये.

इ) आयुर्विमा महामंडळाचे मिळणारे कर्ज रू. ७३,४०,०००/- आणि त्यावरील व्याज व हप्त्याची परतफेड सर्वसाधारण सभेच्या दि. २५.१०.९१ च्या ठरावाप्रमाणे त्याची अंमलबजावणी नियमित केली जाईल याबाबत नगरपरिषदेने दक्षता घ्यावी.

ई) ही योजना पूर्ण झाल्यानंतर ती राबविण्यासाठी शासनाकडून कोणतेही आर्थिक सहाय्य मिळणार नाही.

उ) मंजूर केलेल्या आर्थिक आकृतीबंधात बदल झाल्यास तो या योजनेस लागू होईल.

**४.** पांढरकवडा नगरपरिषद ही 'क' वर्गीय नगरपरिषद आहे. ही योजना नगरपरिषदेची योजना म्हणून महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळातर्फे राबविण्यात येईल. या योजनेचा वित्तीय आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

१) योजनेची निव्वळ किंमत- (१७.५ टक्के आस्थापना व संयत्रे खर्चासह) रु.१,४६,८०,०००/-

२) शासकीय अनुदान ५० टक्के- रु.७३,४०,०००/-

३) आयुर्विमा कर्ज ५० टक्के रू. ७३,४०,०००/-

एकूण - रू. १,४६,८०,०००/-

**५.** पांढरकवडा नगरपरिषद वाढीव पाणी पुरवठा योजनेचा खर्च लेखाशीर्ष मागणी क्र. एफ ५, "२२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता - ०१ - पाणी पुरवठा राज्य योजना (४१) नगरपालिकांच्या (स्थानिक संस्था) पाणी पुरवठा व जलनिस्सारण योजनेसाठी सहाय्यक अनुदाने (२) दांडेकर समितीच्या शिफारसीनुसार त्रुटी भरून काढणे" (२२१५०६९६) या खाली खर्ची घालावा आणि त्या अनुदानातून भागवावा.

**६.** हा शासकीय निर्णय वित्त व नियोजन विभागाच्या सहमतीने वित्त विभागाने शासन निर्णय क्रमांक विअप्र-१०९२/प्र.क्र. ११३/९२/विनियम दिनांक १ जुन १९९२ नुसार विभागास प्रदान केलेल्या प्रशासकीय व वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(चं. अ. देशपांडे)**
कार्यासन अधिकारी.


*''पांढरकवडा शहराच्या वाढीव पाणी पुरवठा योजना व शहराच्या नागरी पाणीपुरवठ्याच्या योजनेबाबत सातत्याने पाठपुरावा केल्याबाबत नुटा बुलेटीनच्या विशेषांकाला हार्दिक शुभेच्छा''*

**बापुरावजी लक्ष्मणराव डोंगरे**
**नगरपालिका कंत्राटदार,**
***पांढरकवडा.***

**आर.बी.सिंग**
**शासकीय कंत्राटदार तथा**
नगरपालिका कंत्राटदार,
***पांढरकवडा***

*''यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजना व शहराच्या नागरी पाणी पुरवठ्याच्या अनुशेषासंबंधी उकल करणाऱ्या नुटा बुलेटीनच्या विशेषांकाला **हार्दिक शुभेच्छा**''*

***लखन रामचरण बोरेले,***
***जकात अभिकर्ता***
**पांढरकवडा नगरपालिका पांढरकवडा**
***जि. यवतमाळ.***

# पांढरकवडा शहराचा खुप दिवसांपासून रेंगाळलेला वाढीव पाणी पुरवठा प्रकल्प एकदाचा पूर्ण झाला आणि त्या योग दरवर्षी भेडसावणारा कडक उन्हाळा यंदा थोडासा सुसह्य होईल !

करण्यात मला अनेक प्राध्यापक व शिक्षक सहकाऱ्यांनी मदत केली. पांढरकवडा येथील महाविद्यालयातील एका कार्यक्रमानंतर अनौपचारिक बैठकीमध्ये प्राचार्य एस.बी. होटे व इतर सहकारी प्राध्यापकांनी शहराच्या पाणीपुरवठ्याबाबतची चर्चा काढली. नगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांशी माझी भेट घडवून दिली नगरपालिकेच्या मुख्य इमारतीच्या सभागृहामध्ये माझ्या अनेक सभा त्यापूर्वी झाल्या होत्या. या योजनेची पाठपुराव्यासाठीची कागदपत्रे गोळा करायला मला फारसा वेळ लागला नाही. पुढे त्याचा सातत्याने आम्ही सभागृहात पाठपुरावा केला.

१३. "पांढरकवडा वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती" या विषयावरील सर्वश्री बी.टी.देशमुख, सुरेश पाटील, पी.जी.दस्तुरकर, व्ही.यू.डायगव्हाणे यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३८७०७ हा **मंगळवार, दिनांक २६ जुलै १९९४** रोजी उत्तरासाठी होता. "११ ऑगष्ट १९९२ च्या शासन निर्णयाने (क्रमांक पा.पु.यो.१०९०/१४२२/सी.आर.१६४/९०/नवि.३०) प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या व प्रत्यक्ष काम सुरु असलेल्या १४६ लक्ष रुपये किंमतीच्या पांढरकवडा वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे" या प्रश्न भाग १ ला मा.नगरविकास मंत्र्यांनी तपशिलवार पुढीलप्रमाणे उत्तर दिले होते :-

"(१) पांढरकवडा वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती पुढीलप्रमाणे आहे :-

(अ) या योजनेसाठी खुनी नदीवर दगडी बंधारा बांधण्यात आला असून ट्रेंच गॅलरीचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

(ब) ऊर्ध्वनलिकेच्या (गुरुत्ववाहीनी) कामाचे कंत्राट निश्चित करण्यात आलेले आहे.

(क) ११ लाख लिटर्स क्षमतेच्या पाण्याच्या उंच टाकीचे काम प्रगतिपथावर आहे.

(ड) जलशुद्धीकरण केंद्राचे कामाकरीता निविदा मागविण्यात आलेल्या असून कंत्राट निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे."

१४. "३१ मार्च १९९४ पावेतो या योजनेवर किती खर्च झालेला आहे " या प्रश्न भाग २ च्या उत्तरात मा. मंत्रिमहोदयांनी "३१ मार्च १९९४ पावेतो या योजनेवर रुपये २४.५७ लाख खर्च झालेला आहे." असे नमुद केले होते. "ही योजना पूर्ण करण्याचे विभागाने काय नियोजन केलेले आहे ?" या प्रश्न भाग ३ ला उत्तर देतांना शासनातर्फे असे नमुद करण्यात आले होते की, **"या योजनेची सर्व कामे निधीच्या उपलब्धतेनुसार डिसेंबर १९९६ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे."**

१५. तारांकित प्रश्न क्रमांक ३८७०७ ला **मंगळवार, दिनांक २६ जुलै १९९४** रोजी दिलेली ही उत्तरे काळजी पुर्वक अभ्यासली तर असे लक्षात येते की ११ ऑगस्ट १९९२ रोजी जरी १४६ लक्ष रूपये किमतीला प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली असली तरी पुढच्या दोन वर्षात (३१ मार्च १९९४ पर्यंत) फक्त २४.५० लाख रूपयेच या योजनेवर खर्च करण्यात आले होते दुसरे असे की, "या योजनेची सर्व कामे निधीच्या उपलब्धतेनुसार डिसेंबर १९९६ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे." असे स्पष्ट आश्वासनही या उत्तरात नमुद होते.

१६. याच विषयावरील **शुक्रवार, दिनांक ७ एप्रिल १९९५** रोजी प्रश्न क्रमांक ४०९०२ ला देण्यात अलेल्या उत्तराचे अवलोकन केल्यास या योजनेच्या कामाच्या प्रगतीचा प्रवास आणखी पुढे गेल्याचे दिसून येईल. "प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या व प्रत्यक्ष काम सुरु असलेल्या १४६ लक्ष रुपये किंमतीच्या पांढरकवडा येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामावर १९९४-९५ या आर्थिक वर्षात किती खर्च करण्याचे नियोजन केले आहे " या प्रश्न भाग १

*यवतमाळ शहर व आजूबाजूच्या परिसरासाठी ''वाढीव पाणीपुरवठ्याचे ''चापडोह प्रकल्प'' कार्यान्वित करण्यास केलेल्या सहकार्याबद्दल मा. आ. श्री. प्रा.बी.टी.देशमुख ह्यांचे न.प. पदाधिकारी तथा सर्व सदस्यगण ह्यांचे कडून* ***हार्दिक आभार***

**यवतमाळ शहरातील नागरिकांकडून न.प.च्या अपेक्षा :-** * नगरपरिषद चे कर वेळेवर भरून नगराचे विकासात सहकार्य करावे. * धराचे आवारात व बाहेर वृक्षारोपण करून जगवावेत. * कुटूंब मर्यादित ठेवा व कुटूंब कल्याण कार्यक्रम यशस्वी करण्यास हातभार लावावा. * घरातील कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावा तो रस्त्यावर, गल्लीत अगर नालीत टाकू नका. * जन्म मृत्यूची नोंद वेळेवर करा. * प्रामुख्याने "पाणी वाचवा". पाणी हे जीवन आहे. ते दुर्मिळ असल्याने आवश्यक तेवढ्याच पाण्याचा उपयोग करून पाण्याची बचत करा. त्याचा एकही थेंब वाया जावू देवू नका. व इतरास काटकसर करण्यास लावा ही नगरपरिषदेची आग्रहाची विनंती.

**नगरपरिषदेचे संकल्प :-** प्रशासकीय इमारतीचे बांधकाम * नागरी मूलभूत सेवा योजनेअंतर्गत शहरातील गलिच्छ वस्तीत व मागासवर्गीय याचेसाठी विशेष सोयी. * शहरातील प्रमुखरस्त्याचे डांबरीकरण * पक्क्या नाल्याचे बांधकाम * अद्यावत स्वरूपाचे सुलभ शौचालय * रस्त्याचे दुतर्फा विद्युतीकरण व विभाजक बांधकाम. * हिंदु/मुस्लीम स्मशानभूमीचे सौंदर्यीकरण तथा अंत्य संस्कारासाठी न.प. तर्फे मोफत व्यवस्था (सरण) * शहरातील पाण्याचे दुर्भिक्ष लक्षात घेवून जास्तीत जास्त विंधन विहिरी तयार करणे. * चापडोह प्रकल्पापासून लवकरात लवकर पाणी मिळावे ह्यासाठी सतत प्रयत्नशील.

मो. शकील मो. इस्माईल
उपाध्यक्ष

श्री. विष्णूपंत उगलमुगले
अध्यक्ष

श्री. ब.धो. चिंतावार
मुख्याधिकारी

**गोपिकिसन निमोदिया** सभापती बांधकाम समिती, **श्रावण डोंगरे** सभापती सार्व. आरोग्य व वै. समिती, **किशोर गुल्हाणे** सभापती नियोजन व विकास समिती, **सौ.माधुरी अराठे** सभापती शिक्षण समिती, **सौ. बेबीताई नामुर्ते** सभापती, महिला व बाल कल्याण समिती, **गोविंद हातागळे** सभापती मागासवर्गीय कल्याण समिती, **कैलास सुलभेवार** सदस्य स्थायी समिती, **महेश जैस्वाल** सदस्य स्थायी समिती, **दत्ताभाऊ कुळकर्णी** सदस्य स्थायी समिती तथा सर्व सदस्यगण व कर्मचारी,

***नगरपरिषद, यवतमाळ.***

च्या उत्तरात मा. नगरविकास मंत्र्यांनी "**१९९४-९५ या वर्षात सदर योजनेवर रु.८२.०० लाख खर्च करण्याचे नियोजन केले आहे**" असे नमुद केले होते. तसेच "ही योजना डिसेंबर १९९६ मध्ये पूर्ण करण्याचे दृष्टीने विभागाने काय आर्थिक नियोजन केलेले आहे ?" या प्रश्न भाग २ च्या उत्तरात "सन १९९५-९६ व १९९६-९७ साठी एकूण रु. ४०.२३ लाख खर्चाचे नियोजन आहे." अशी माहिती देण्यात आली होती.

१७. आणखी पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने आम्ही विचारलेला याच विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक १४०२ हा **बुधवार, दिनांक २६ जुलै १९९५** रोजी उत्तरासाठी होता. "प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या व काम सुरु असलेल्या १४६ लक्ष रुपये किंमतीच्या पांढरकवडा येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामावर ३१ मार्च १९९५ पावेतो प्रत्यक्ष एकूण किती खर्च करण्यात आला आहे " या प्रश्न भाग एकला मा. मुख्यमंत्र्यांनी "**३१ मार्च १९९५ पावेतो या योजनेवर प्रत्यक्ष खर्च रु. ७२.०४ लक्ष एवढा करण्यात आला आहे.**" असे उत्तर दिले होते. "१९९५-९६ या आर्थिक वर्षात किती निधी या कामासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे " या प्रश्न भाग २ च्या उत्तरात असे नमुद करण्यात आले होते की, "**१९९५-९६ या आर्थिक वर्षात रु. ५२.०० लाख एवढा निधी उपलब्ध आहे.**" "या

## वेगाव (ता. मारेगाव जि. यवतमाळ) येथील पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे काम

**महाराष्ट्र विधान परिषद : : पहिले अधिवेशन १९९६**
**मंगळवार, दिनांक १९ मार्च १९९६**

**(१७) ७६१८ सर्वश्री. बी.टी.देशमुख, व्ही. यु. डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील** : सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

१. वेगाव (ता.मारेगाव जिल्हा यवतमाळ) या गावाच्या पाणी पुरवठा योजनेचा भाग असलेली जलनिस्सारण मंडळातर्फे बांधण्यात येणारी पाण्याची टाकी १० वर्षापासून अपूर्णावस्थेत आहे ती त्वरीत पूर्ण करण्याबाबतची मागणी उक्त गावच्या ग्रामस्थांनी दिनांक ४ डिसेंबर १९९५ रोजी सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा मंडळ याना व मा. ग्राम- विकास मंत्री यांचेकडे वेगवेगळी निवेदने पाठवून केली हे खरे आहे काय?

२. असल्यास मे १९९५ मध्ये कामाला सुरूवात केल्यानंतर टाकीच्या कामासाठी खोदकाम करतांना मोठे दगड लागल्याने व कंत्राटदाराला ब्लास्टींग युनिट उपलब्ध न होवू शकल्यामुळे हे काम बंद पडले हेहि खरे आहे काय?

३. असल्यास आलेल्या अडचणींच्या निवारणार्थ शासनाने काय कारवाई केलेली आहे वा करण्याचे योजीले आहे ?

४. अद्यापही कारवाई केलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अण्णा डांगे :** (१) होय.

(२) नाही. तथापि, मोठे दगड फोडण्यासाठी कुशल कामगार कंत्राटदारास न मिळाल्यामुळे खोदकाम मे १९९५ पासून अर्धवट राहिले, हे खरे आहे.

(३) सदर काम त्या ठिकाणावर जाऊन सुरू करण्याकरिता रस्त्याचे काम पूर्ण झालेले असून मोठे दगड फोडण्यासाठी कंत्राटदाराकडे कुशल कामगार उपलब्ध झालेले आहेत. त्यामुळे हे काम पूर्ण करण्यास अडचणी राहिलेल्या नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## वेगाव (ता. मारेगाव जि. यवतमाळ) येथील पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे काम

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन १९९६*
*शुक्रवार, दिनांक १३ डिसेंबर १९९६*
*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या*
*तिसऱ्या यादितील प्रश्न क्रमांक (२) ८७२६*

**(२) ८७२६ (२४.६.९६) सर्वश्री. पी.जी.दस्तुरकर, बी.टी.देशमुख, व्ही. यु. डायगव्हाणे, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील** तारांकित प्रश्न क्रमांक ७६१८ ला दिनांक १९ मार्च १९९६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय पाणीपुरवठा मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

१. वेगाव (ता.मारेगाव) या गावाच्या पाणीपुरवठा योजनेचा भाग असलेल्या प्रकल्पाच्या विविध उपांगांच्या बांधकामाची सद्यःस्थिती काय आहे;

२. या योजनेतील कोणकोणती उपकामे आतापावेतो पूर्ण झालेली आहेत;

३. या योजनेचा भाग असलेले पाण्याच्या टाकीचे काम पूर्ण झालेले आहे हे खरे आहे काय;

४. नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत;

**श्री. अण्णा डांगे (१७.९.९६) :** (१) व (२) वेगाव (ता. मारेगाव) येथील योजनेच्या कामांची सद्यःस्थितीतील पूर्ण व अपूर्ण कामे खालीलप्रमाणे आहेत :-

**(अ) पूर्ण कामे :** (१) पुरवठा विहीर, (२) पाणबुडे पंप (पंपिंग मशिनरी), (३) उर्ध्ववाहिनी, (४) वितरण व्यवस्था (अंशतः पूर्ण)

**(ब) अपूर्ण कामे :** (१) पाण्याची उंच टाकी (प्रगतीत (२) उर्वरित वितरण व्यवस्था (प्रगतीत),

(३) नाही.

(४) विलंबाची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

(अ) पाच वेळा निविदा बोलाविण्यात आल्या परंतु प्रतिसाद मिळाला नाही.

(ब) ग्रामपंचायतीने जागा उपलब्ध करून देण्यास विलंब केला.

(क) उपलब्ध करून दिलेली जागा टाकीच्या पायथ्याचे खोदकाम केल्यानंतर तांत्रिकदृष्ट्या अयोग्य असल्याचे निदर्शनास आले.

(ड) नव्याने उपलब्ध जागेतील खोद कामातील मोठे दगड फोडण्यासाठी मजूर मिळाले नाही तसेच पावसाळ्यात सदर जागेवर साहित्य घेण्याकरिता रस्ता उपलब्ध नव्हता.

*''यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजना व शहराच्या नागरी पाणीपुरवठ्याच्या अनुशेषासंबंधी लागोपाट पाठपुरावा करणाऱ्या नुटा बुलेटीनच्या विशेषांकाला **हार्दिक शुभेच्छा**''*

**सुरेश चोपडे** — *अध्यक्ष*
**मधुकर मोहुर्ले** — *उपाध्यक्ष*
**हनुमानप्रसाद पांडे** — *सचिव*

**नगरपालिका कर्मचारी सहकारी पतपेढी संस्था** र.नं. १०४
*पांढरकवडा जि. यवतमाळ*

*''पांढरकवडा शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजना व शहराच्या नागरी पाणीपुरवठ्याच्या योजनेबाबत सातत्याने पाठपुरावा केल्याबाबत नुटा बुलेटीनच्या विशेषांकाला **हार्दिक शुभेच्छा**''*

जयप्रकाश इलेक्ट्रीकल्स पांढरकवडा
*प्रो.जयप्रकाश बाबुलाल चमेडिया*
**वैभव किराणा स्टोअर्स पांढरकवडा**
*प्रो. बंडू कोंडावार*
**महालक्ष्मी टेक्सटोरियम पांढरकवडा**
*प्रो, विजय कोंडावार*
***मे चिंतावार जनरल स्टोअर्स पांढरकवडा***
*प्रो. मधुकरराव चिंतावार*

योजनेच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे ?" या प्रश्न भाग तीनच्या उत्तरामध्ये "**योजनेतील दगडी बंधारा, पाण्याची उंच टाकी यांचे काम पूर्ण झाले असून गुरुत्ववाहिनी व जलशुद्धीकरण केंद्राचे काम प्रगतीपथावर आहे.** वितरण व्यवस्था, शुद्ध व अशुद्ध पाण्याच्या पंपाचे साहित्य प्राप्त झाले असून वितरण व्यवस्थेच्या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत." अशी माहिती देण्यात आली होती. डिसेंबर १९९६ पर्यंत काम पूर्ण होण्याची अपेक्षा आहे अशा प्रकारचे आश्वासन शासनातर्फे जुलै १९९४ मध्येच देण्यात आले होते. आणि आता जुलै १९९५ मध्ये वितरण व्यवस्थेच्या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत असे उत्तर देण्यात आले होते. व त्यामुळेच वितरण व्यवस्थेच्या उपकामाचा पाठपुरावा करणे आवश्यक झाले होते.

१८. पाण्याच्या उंच टाकीचे काम पूर्ण झाल्याचे प्रश्न भाग ३ च्या उत्तरामध्ये नमुद करण्यात आले होते त्यावरुन पुन्हा वेगावच्या टाकी प्रकरणाची आठवण झाली. घाटंजी शहराच्या वाढीव पाणी पुरवठा योजना विशेषांकातील माझ्या लेखाच्या परिच्छेद १३ मध्ये (१९९६ चे नुटा बुलेटीन पृष्ठ ३७) पुढील उल्लेख आहे. :-

" पाण्याच्या टाकीचे काम पूर्ण न होण्याबाबत घाटंजीच्या नगराध्यक्षांनी सप्टेबर १९९५ च्या दरम्यान केलेल्या तक्रारीवरून यवतमाळ जिल्ह्यातील वेगाव तालुका मारेगाव येथील पाण्याच्या टाकीच्या बांधकामाचे प्रकरण आठवले. तीन चार हजार लोकसंख्येच्या या गावासाठीच्या पाणीपुरवठा योजनेला १ नोव्हेंबर १९८८ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. योजनेच्या कामाला जानेवारी १९८९ मध्ये सुरुवात झाली. योजनेची पुरवठा विहीर, पाणबुडे पंप, उर्ध्व वाहिनी व गावाच्या काही भागातील वितरण व्यवस्था ही कामेही पूर्ण झालेली आहेत, पण या योजनेचा भाग असलेल्या पाण्याच्या टाकीचे लहानसे काम मात्र गेल्या सात आठ वर्षात पूर्ण होवू शकलेले नाही. मारेगाव तालुक्याचे विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे कार्यवाह श्री.जी.एन. राजुरकर यांनी व या गावच्या नागरिकांनी नोव्हेंबर १९९५ मध्ये याबाबतच्या तक्रारीची निवेदने यथोचित पद्धतीने पाठवून " या पाण्याच्या टाकीच्या न झालेल्या कामाकडे" संबधित मंत्र्यांचे लक्ष वेधले आहे. या तक्रार निवेदनाच्या प्रति त्यांनी पालकमंत्री, आमदार श्री. वामनराव कासावार, श्री.व्हि.यु.डायगव्हाणे, आमदार श्री. पुरके, व माझ्याकडे सुद्धा पाठविल्या आहेत. आम्ही सर्वच लोकप्रतिनिधींनी बांधकाम न झालेल्या या पाण्याच्या वेगाव टाकीचे प्रकरण गंभीरपणे घेतले असून सभागृहाच्या पातळीवर त्याचा उत्तम पाठपुरावा करण्याचे ठरविले आहे"

सभागृहातील आमच्या या पाठपुराव्याला उत्तम यश आले आहे हे नमूद करतांना मला आनंद वाटतो.

## वेगाव (ता. मारेगाव जि. यवतमाळ) येथील पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे काम

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन, १९९७*
*सोमवार, दिनांक २१ एप्रिल १९९७*

**(५) १५५४७ सर्वश्री. बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील, व्ही. यु. डायगव्हाणे** दिनांक १३ डिसेंबर १९९६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या तिसऱ्या यादीतील प्रश्न क्रमांक ८७२६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय पाणीपुरवठामंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

१. वेगाव (ता.मारेगाव) या गावाच्या पाणीपुरवठा योजनेचा भाग असलेल्या पाण्याची उंच टाकी व उर्वरित वितरण व्यवस्था या दोन उपांगांच्या बांधकामाची सद्यस्थिती काय आहे;

२. अंशतः पूर्ण व प्रगतीत असलेली उपकामे पूर्ण करण्याचे काय नियोजन करण्यात आलेले आहे;

३. नियोजन करण्यात आलेले नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ;

४. नियोजन करण्यात आलेले असल्यास उक्त नियोजनाप्रमाणे हा प्रकल्प केंव्हा कार्यान्वीत होण्याचे प्रस्तावित आहे;

**श्री.अण्णा डांगे :** (१) सद्यःस्थितीत पाण्याच्या उंच टाकीचे काम प्रगतीपथावर असून तसेच उर्वरित वितरण व्यवस्थेचे काम लवकरच सुरू करण्यात येत आहे.

(२) उंच टाकी व उर्वरित वितरण व्यवस्थेची कामे जुन १९९७ अखेर पूर्ण करणे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) **सदर योजना उपांगासह ऑगस्ट १९९७ अखेर पूर्ण करण्यात येईल**

१९. पांढरकवडा वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती या विषयावरील **गुरुवार, दिनांक २१ मार्च १९९६** रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या दुसऱ्या यादितील प्रश्न क्रमांक ४५४३ ला देण्यात आलेली उत्तरे या पाठपुराव्याच्या दृष्टीने पहाण्यासारखी आहेत. "प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या व काम सुरु असलेल्या १४६ लक्ष रुपये किंमतीच्या पांढरकवडा येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाचा भाग असलेल्या वितरण व्यवस्थेच्या कामाच्या निविदा मागवून प्रत्यक्ष काम सुरु करण्याच्या प्रश्नांची सद्यःस्थिती काय आहे व वितरण व्यवस्थेचे काम नियोजनाप्रमाणे केव्हा पूर्ण करावयाचे आहे " या प्रश्न भाग १ च्या उत्तरामध्ये मा. पाणीपुरवठा मंत्र्यांनी "वितरण व्यवस्थेच्या कामाचे कंत्राट देण्यात आले असून ठेकेदाराकडून प्रत्यक्ष कामास दिनांक ११ नोव्हेंबर १९९५ ला सुरुवात करण्यात आली असून ह्या कामाकरीता लागणारे पाईप्स मिळविण्यात आले आहेत. काम पूर्ण


*'आमच्या जिल्ह्यातील पांढरकवडा शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजना व शहराच्या नागरी पाणीपुरवठा अनुशेषासंबंधी उकल करणाऱ्या नुटा बुलेटीनच्या विशेषांकाला*
***हार्दिक शुभेच्छा''***

**शंकर मनोहरपंत बढे**

***शासकीय कंत्राटदार तथा नगरपालिका कंत्राटदार***

*पांढरकवडा जि. यवतमाळ*

**हार्दिक शुभेच्छा**

***मे. भोयर स्टील सेंटर, पांढरकवडा***

प्रो. दिगांबरराव भोयर

चिंतावार जनरल स्टोअर्स व कृषि केंद्र पांढरकवडा

प्रो. दिलीप चिंतावार

तुषार इलेक्ट्रीकल्स पांढरकवडा

प्रो.दिलिप बैद

***महेश प्रिंटीग प्रेस, पांढरकवडा***
***प्रो. अशोक आरेवार***

**साप्ताहिक केळापूरचे वारे**
***संपादक :- सेवेन्द्र मानकर***

करण्याची नियोजित तारीख ९ जून १९९६ आहे." असे नमुद केले होते. " वितरण व्यवस्थेच्या कामाला केव्हा सुरुवात झाली आहे ;" या प्रश्न भाग २ च्या उत्तरात "**वितरण व्यवस्थेचे कामास दिनांक ११ नोव्हेंबर १९९५ पासून सुरुवात झालेली आहे.**" अशी माहिती देण्यात आली होती.

२०. याच विषयावरील **शुक्रवार, दिनांक १३ डिसेंबर १९९६** रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या चौथ्या यादितील प्रश्न क्रमांक ८७४७ ला देण्यात आलेली उत्तरे सुद्धा पाठपूराव्याच्या दृष्टीने माहितीपूर्ण असल्याचे दिसून येईल. "प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या व काम सुरु असलेल्या १४६ लक्ष रुपये किंमतीच्या पांढरकवडा येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेचा भाग असलेल्या विविध उपांगांच्या बांधकामाची सद्यःस्थिती काय आहे?" या प्रश्न भाग १ च्या उत्तरामध्ये मा.पाणीपुरवठा मंत्र्यांनी या योजनेच्या निरनिराळ्या १० उपकामांची सद्यस्थित तपशिलवारपणे नमुद केली होती. पुरवठा विहिर, दगडी बंधारा, अशुद्ध पाण्याच्या पंपाची उभारणी ही तीन उपकामे पूर्ण झाल्याचे उत्तरात नमुद करण्यात आले होते. इतर ७ कामांची सद्यस्थिती उत्तरात दर्शविण्यात आली होती. "वितरण व्यवस्थेच्या कामाच्या निविदा मागवून प्रत्यक्ष काम सुरु करण्याच्या प्रश्नांची सद्यःस्थिती काय आहे व वितरण व्यवस्थेचे काम नियोजनाप्रमाणे जून, १९९६ पर्यंत पूर्ण करुन वाढीव पाणीपुरवठा योजना प्रत्यक्ष कार्यान्वित करण्याचे विभागाने काय नियोजन केले आहे?" या प्रश्न भाग ३ च्या उत्तरामध्ये असे नमुद करण्यात आले होते की, "**वितरण व्यवस्थेच्या निविदा मंजूर करण्यात येऊन दिनांक ११ नोव्हेंबर १९९५ ला काम सुरु करण्यात आले, व डिसेंबर १९९६ पर्यंत हे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.**"

२१. अनेकदा योजना पूर्ण करण्याचे नियोजन निरनिराळ्या कारणांनी विस्कळीत होते. कुठे निधीचा पुरेसा पुरवठा होत नाही. कुठे कंत्राटदाराने वाद निर्माण केले असतात. कुठे पाहिजे ती साधनसामुग्री उपलब्ध झालेली नसते. या व अशा निरनिराळ्या कारणांनी वेगवेगळ्या उपकामांच्या बांधकामाला व पर्यायाने एकूणच प्रकल्पाला विलंब होतो. (सद्दाम हुसेनने आखातात सुरू केलेल्या युद्धामुळे अमरावती पाणी पुरवठा योजनेच्या बांधकामाची कार्यपूर्ती ५-६ महिन्याने पुढे सरकली होती.) हे लक्षात घेता **प्रशासकीय मान्यताप्राप्त बांधकामाधीन प्रकल्पांच्या गतीवर, प्रगतीवर गतिरोधावर किंवा दुर्गतीवर सतत लक्ष ठेवून रहाणे हा लोकप्रतिनिधींच्या कामाचा एक अत्यंत महत्वपूर्ण असा भाग असतो.** त्यादृष्टीने विचार करु जाता **शुक्रवार, दिनांक १३ डिसेंबर १९९६** रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या चौथ्या यादितील प्रश्न क्रमांक ८७४७ चे उत्तर समाधानकारकच म्हटले पाहिजे. कारण "**डिसेंबर १९९६ पर्यंत हे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे**" या आश्वासनाचा शासनाने प्रश्न भाग २ च्या उत्तरामध्ये पुनरूच्चार केला होता.

२२. "पांढरकवडा वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती" या विषयावरील सर्वश्री जयवंत ठाकरे, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, व्ही.यु.डायगव्हाणे यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १५५१३ हा **सोमवार, दिनांक ३१ मार्च १९९७** रोजी उत्तरासाठी होता. "प्रशासकीय मान्यता प्राप्त १४६ लक्ष रुपये किमतीच्या पांढरकवडा येथील वाढीव पाणी पुरवठा योजनेचा बांधकामाधीन प्रकल्प पूर्ण करून नियोजनाप्रमाणे डिसेंबर १९९६ मध्ये कार्यान्वीत करण्यात आला हे खरे आहे काय?" या प्रश्न भाग १ ला पाणी पुरवठा मंत्र्यांनी "नाही. तथापि बंहुतांशी कामे डिसेंबर १९९६ पर्यंत पूर्ण करण्यात आली." असे उत्तर दिले होते. "असल्यास, प्रकल्पातून पाणीपुरवठा केव्हा सुरू करण्यात आला आहे," या प्रश्न भाग २ च्या उत्तरात "**१२ मार्च १९९७ मध्ये पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.**" असे नमुद करण्यात आले होते.

**- *प्रा.बी.टी.देशमुख,*** *विधानपरिषद सदस्य.*

********

## ऋणनिर्देश

यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा या क वर्ग नगरपालिकेच्या हद्दीतील लोकांची पाण्याची तहान भागविण्यासाठीही पुरेसे पाणी उपलब्ध होऊ नये असा या शहराचा नागरी पाणी पुरवठा अनुशेष! आणि या समस्येचे सांगोपांग विश्लेषण करणारा नुटा बुलेटीनचा हा विशेषांक !!

हा विशेषांक प्रकाशित करण्यासाठी आवश्यक असलेले अर्थ बळ उभारण्यात ज्यांनी सक्रिय सहकार्य दिले त्या .... आदरणीय माजी आमदार श्री. अण्णासाहेब देशमुख पारवेकर श्री. विष्णूपंत उगलमुगले, अध्यक्ष न.प. यवतमाळ, श्री. ब.धो.चिंतावर मुख्याधिकारी, न.प.यवतमाळ, श्री. एस.एस.निपाणे, मुख्याधिकारी न.प. पांढरकवडा, श्री. दिलीप वारेकर लेखापाल न.प. पांढरकवडा यांचे प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे सहकार्य आम्हाला मिळाले त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

हस्ते परहस्ते, प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे विधानपरिषदेतील या चर्चा कानावर आल्यानंतर या अंकाच्या प्रकाशनासाठी आग्रहपूर्वक प्रयत्न करणाऱ्या श्री. बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय पांढरकवडा येथील नुटाच्या स्थानिक शाखेच्या सर्व सदस्यांचा ऋणनिर्देश करणे त्यांनाहि आवडणार नाही पण त्यांच्या धडपडीचा निर्देश तर केलाच पाहिजे.

**-ए.जी.सोमवंशी,**
संपादक, नुटा बुलेटीन

**आनंद एजन्सीज्**
*(बुक डेपो, स्टेशनरी व फर्नीचर)* महाराष्ट्र बँकेसमोर, मेन रोड, पांढरकवडा.
**प्रोप्रा एस. व्ही. केळापूरे**

**NUTA BULLETIN** (Fortnightly Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **PUBLISHER : Prof. V.K. Pande,**7,Yeshwant Appartments Laxmi Nagar,**WARDHA-442 001.** Composed at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Offset Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. ATI 83 Licenced to post without prepayment **LICENCE NO. ATI 10** Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **18- 05 - 1997**

**if Undelivered please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

To,............................................................
...................................................................
...................................................................